# पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. ~~----~~ २।३१८, दि. ३१।०७।२०१८

## जाहिरात प्रकटन

आरोग्य कार्यालयाअंतर्गत खालील अस्थायी पदावर ६ महिन्यांकरीता, करार पध्दतीने, एकवट मानधनावर सेवा घ्यावयाची असल्याने अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | हुद्दा | एकवट मासीक मानधन रुपये | शैक्षणिक अर्हता | अनुभव | एकूण पदांची संख्या | गट |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फिजिशीयन वर्ग–१ | ३०,००० | एम. डी. (मेडिसीन) | ३ वर्षांचा फिजिशीयन या पदावर काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य | १० | अजा – १, अज – १, विजाअ– १, इमाव– २, खुला– ५ |
| २ | बालरोगतज्ञ वर्ग–१ | ३०,००० | एम.डी.(पेडीयाट्रिक) | ३ वर्षांचा बालरोगतज्ञ या पदावर काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य | १० | अजा – १, अज – १, विजाअ– १, इमाव– २, खुला– ५ |
| ३ | रेडिओलॉजिस्ट वर्ग–१ | ३०,००० | एम. डी. (रेडिओलॉजी) | ३ वर्षांचा रेडिओलॉजिस्ट या पदावर काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य | ५ | अजा – १, अज – १, खुला – ३ |
| ४ | सर्जन, जनरल वर्ग–१ | ३०,००० | एम. एस. जनरल सर्जरी | ३ वर्षांचा सर्जन, जनरल या पदावर काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य | ८ | अजा – १, अज – १ विजाअ – १ इमाव –१, खुला – ४, |
| ५ | स्त्रीरोगतज्ञ वर्ग–१ | ३०,००० | एम.डी./ एम.एस. गायनॅकोलॉजी | ३ वर्षांचा स्त्रीरोगतज्ञ या पदावर काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य | १५ | अजा –२, अज – १, विजाअ –१, भजब – १, इमाव – २, खुला – ८ |
| ६ | चेस्ट स्पेशालीस्ट वर्ग–१ | ३०,००० | एम.डी. चेस्ट मेडीसीन | ३ वर्षांचा चेस्ट स्पेशालीस्ट या पदावर काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य | २ | अजा – १, खुला –१ |
| ७ | सर्जन, पेडियाट्रीक्स वर्ग–१ | ३०,००० | एम.एस. पेडियाट्रीक्स सर्जरी | ३ वर्षांचा सर्जन, पेडियाट्रीक्स या पदावर काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य | ५ | अजा – १, अज – १, खुला – ३ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | फिजिओथेरपीस्ट वर्ग–२ | ३०,००० | बी.एस.सी. फिजीओथेरपी | ३ वर्षांचा फिजिओथेरपीस्ट या पदावर काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य | ५ | अजा – १, अज –१, खुला – ३, |
| ९ | ई.सी.जी टेक्निशीयन वर्ग–३ | ७,००० | एस.एस.सी. उत्तीर्ण व रेडिओग्राफर कोर्स उत्तीर्ण | ३ वर्षांचा असि. एक्स रे टेक्निशीयन या पदावर काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य | ४ | अजा – १, अज – १, , खुला– २ |
| १० | ऑ. नर्स वर्ग–३ | ७,००० | (१) ऑ. नर्स मिडवायफरी उतीर्ण (२) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल मुंबई यांचे रजिस्ट्रेशन आवश्यक. | लागू नाही. | १३ | अजा – २, अज–१, विजाअ –१, इमाव – २, खुला – ७ |

**अटी : १. वयोमर्यादा** : खुल्या वर्गातील उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकास ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा ५ वर्षाने शिथिल असेल. तसेच वयोमर्यादेनुसार आवश्यक पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास रु. ३०,००० एकवट मासिक मानधन असणाऱ्या पदांकरीता वयोमर्यादेची अट शिथिल करण्यात येईल. **२.** वरील शैक्षणीक पात्रता व अनुभव आवश्यक. **३.** सदरचे पद अत्यंत अस्थायी स्वरूपाचे आहे. ४.अ.क्र.१ ते ८ पदांच्या नेमणूका प्रगट मुलाखतीसाठी **(wallk in interview )** व अ.क्र.९ ते १० पदाच्या नेमणूका **(Objective Assessment )**ऑब्जेक्टीव्ह असेसमेंट पध्दतीने करण्यात येतील. **५.** उमेदवारांनी पात्रता व अनुभवाच्या मूळ कागदपत्रांसह हजर राहणे आवश्यक आहे. **६.** उमेदवारांनी एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मूळ कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीचा एक संच सादर करणे आवश्यक आहे. **७.** अर्ज करताना उमेदवारांची जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा जन्मतारखेची नोंद आसलेली शालान्त परीक्षेच्या उतीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक. ८. उमेदवार मागासवर्गीय असल्यास जातीचा स्पष्ट उल्लेख करुन कोणत्या प्रवर्गात मोडत आहे याचा उल्लेख करावा. ९. अर्जदार महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.(शासनमान्य). **१०.** विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज अपुर्ण किंवा चूकीचे भरलेले अर्ज, वय शैक्षणिक अर्हता गुणपत्रक, जातीचा दाखला, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्य प्रती (ट्रु–कॉपी) जोडले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील. **११.** निवड झालेल्या उमेदवारांना विहीत नमुन्यात करारनामा करून फक्त ६ महिन्यांकरीता नेमणूक दिली जाईल. **१२.** येणाऱ्या उमेदवारांनी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. **१३.** वरील पद हे अस्थायी स्वरूपाचे

असल्याने या पदावर कायमस्वरूपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही. १४. वरील पदासाठी कामाचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार मा. खातेप्रमुख यांना राहील. १५.अ.क्र १ ते ८चे पदांना दररोज ४ तास (रूग्णालयाचे सोईनुसार)सेवा देणे बंधन कारक असेल तथापी अन्य पदांची कामकाजाची वेळ निश्चित करण्याचे अधिकार खातेप्रमुख यांचे असतिल. १६.अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. १७. बोलाविलेल्या उमेदवारास नियुक्ती देण्याबाबतचे सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी स्वत: कडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.१८. रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. पदांची संख्या समांतर आरक्षण याबाबत बदल करणे, मुलाखत स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकारी मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका हे स्वतः कडे राखून ठेवतील. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नांही. १९. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल. २०. निवड झालेल्या उमेदवारास सेवेत रुजू होण्यापूर्वी एका महिन्याचे मानधन अनामत रक्कम म्हणून भरावे लागेल व त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

वरीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांनी दि. ८/८ /२०१८ रोजी सकाळी -१०.०० ते दुपारी - २.०० या वेळेत कॅ. वडके सभागृह आरोग्य कार्यालय ,तिसरा मजला पुणे महानगरपालिका मुख्य इमारत , शिवाजीनगर पुणे ४११०५ येथे विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सह उपस्थित रहावे.

उमेदवाराने सादर करावयाचा विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयामार्फत देण्यात येईल.

(डॉ. अंजली साबणे )
सहा. आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका